International Referred Research Journal, April, 2011. ISSN- 0974-2832 RNI-RAJBIL 2009/29954.VoL.III *ISSUE-27

शोध पत्र- मराठी

# मराठी काव्यसृष्टीतील चमत्कार : बहिणाबाई

April, 2011

* डॉ. प्रभावती बी. महाजन

विभागप्रमुख, अरूणोदय ज्ञानप्रसारक मंडळ संचलित आर्ट, कॉमर्स आणि होमसाईन्स, वूमन कॉलेज, जळगाव,

खानदेश आणि काव्य यांचे समीकरण म्हणजेच निसर्गकन्या, भूमीकन्या बहिणाबाई ! मराठी वाङ्मयातच नव्हे तर अख्या जगाला वेड लावणारी 'बहिणाबाईची गाणी' म्हणजे मराठी वाङ्मयात घडलेला चमत्कारच म्हणावा लागेल, लेखन करणे ही सुशिक्षित लोकांची मक्तेदारी; परंतु कुठल्याही शाळेत न जाता जीवनाचे तत्त्वज्ञान तत्त्वज्ञ आणि शास्त्रज्ञ सांगू शकणार नाहीत असे तत्वज्ञान खानदेशच्या या अडाणी आणि शेतकरी स्त्रीच्या मुखातून बाहेर पडले. याला चमत्कार नाही म्हणावे तर काय म्हणावे !

बहिणाबाईची गाणी जेव्हा प्र.के.अत्र्यांना दाखविली तेव्हा ते म्हणतात, "हे बावनकशी सोनं महाराष्ट्रापासून लपवून ठेवणं हा गुन्हा आहे. त्याला तुम्ही प्रकाशात आणा." आणि बहिणाबाईचे सुपुत्र कवीवर्य सोपानदेव चौधरींनी त्या काव्याला 'बहिणाबाईची गाणी' म्हणून प्रकाशित केले. तेव्हा ती सर्वांना समजली.मानवी जीवन केवढे भव्य आणि दिव्य! किती सुंदर आणि किती अप्रतिम ! सौंदर्य आणि तत्त्वज्ञानाने भरलेले ! सहस्रधारांनी आत्मदान करणाऱ्या वर्षाऋतुचे अनुपान करण्यासाठी तितकीच क्षमता आणि पात्रता असावी लागते.अशी पात्रता व क्षमता कवयित्री बहिणाबाई चौधरी हयांच्यापाशी होती. यात यत्किंचितही संशय नाही. चातकाच्या चोचीने टिपलेल्या जलबिंदूतही तहान भागविण्याचे व तृप्त करण्याचे संजीकत्व असावे लागते. असे संजीकत्व बहिणाबाईच्या प्रत्येक कवितेत आढळते.

संतकाव्य, पंडितीकाव्य आणि शाहिरीकाव्य यांच्या त्रिवेणी संगमातून पुढे निघालेली काव्यगंगा पुढे अनेक धारांनी समृद्ध झाली. साऱ्या महाराष्ट्राचं जीवन या काव्यधारेने आपल्या कवेत घेतले. याच काव्यगंगेतील एक चैतन्यमय, खळाळता प्रवाह म्हणजे बहिणाबाईंची कविता ! बहिणाबाई ह्या खानदेशच्या पण आपल्या रसाळ (वाणीने) काव्यबोलांमुळे त्या फक्त खानदेशच्याच न राहाता पूर्ण महाराष्ट्राच्या झाल्या. पण आमचा खानदेश त्यांनी खानदेशी बोलीत मूर्त साकार केलाय आपल्या काव्यविश्वात !जळगाव जवळील असोदा या गावी एका शेतकरी कुटुंबात त्या जन्मल्या.शेतीची कामं करत त्या वाढल्या. महाजनांची लेक चौधरी यांची सून झाली.खानदेशच्या लेवा पाटील कुळाची ही कन्या म्हणजे खानदेशचे भूषण आहे. नव्हे साऱ्या महाराष्ट्राचे भूषण होय.सारे जीवन कष्टमय दशेत काढले.प्रत्येक वेळी आलेला अनुभव आपल्या वाणीतून अवतरला आणि अवतरलेला हा अनुभव त्यांचे सुपुत्र कवी सोपनदेव चौधरी यांनी शब्दबद्ध केला.कोणतेही पुस्तकी शिक्षण न घेता जीवनाचे यथार्थ दर्शन घडविणाऱ्या तसेच निसर्गाचे दर्शन घडविणाऱ्या कविता करणाऱ्या निसर्गकन्या, खानदेशकन्या बहिणाबाई म्हणतात,

**"अरे संसार संसार, जसा तवा चुल्हयावर**
**आधी हाताले चटके, तव्हा मियते भाकर"**

**बहिणाबाईंचं काव्य जीवनस्पर्शी आहे.**

जीवनाच्या अनेक पदरांना उलगडून दाखविण्याचे सामर्थ्य त्यात आहे.

**"नाही सरलं सरलं, जीवा तुझं येनं जानं**
**जसा घडला मुक्काम, त्याला म्हणता रे जीनं"**

जीवन कशाला म्हणावे? हे अगदी मार्मिक शब्दात त्या मांडतात. यावरील त्यांचे भाष्य मोठे मनोवेधक आहे.

**"आला सास गेला सास, जीवा तुझं रे तंतर**
**अरे जगनं-मरनं, एका सासाचं अंतर"**

इतकं श्रेष्ठ काव्यात्म तत्त्वज्ञान मराठी साहित्यात चुकूनच सापडेल. या तत्त्वज्ञानाला लोकतत्त्वाची बैठक आहे.बहिणाबाईची निरीक्षण शक्तीही मोठी दांडगी होती. सुगरणीच्या खोपा आपणास आवडतो. आपण पाहतो. परंतु तो कसा आहे. तिने कसा बनविला हयाचे निरीक्षण करून ती सुगरणीच्या कर्तृत्वाची महती माणसाला सांगते.

**"अरे खोप्यामधी खोपा, सुगरणीचा चांगला**
**देखा पिलासाठी तिनं, झोका झाडाले टांगला**
**पिलं निजले खोप्यात, जसा झुलता बंगला**
**खोपा इनला इनला, जसा गिलक्याचा कोसा**
**पाखराची कारागिरी, जरा देख रे मानसा"**

अशाप्रकारे बनविलेल्या खोप्याला सुंदर सुंदर उपमा देऊन माणसाला संदेशही देऊन टाकला.सहजस्फूर्त आणि सहजतेने दिलेला हा संदेश बहिणाबाईच्या प्रतिभेची साक्ष पटवितो. अहंकारी माणसाला त्या म्हणतात,

**"अरे मी कोन, मी कोन?**
**आला मानसाले ताठा, म्हने मी कोन?**
**अशा त्याच्या मी पनाले मसनांत सिंव्हासन"**

**यात त्यांच्या अनुभवांना त्यांच्या उत्फूर्त भाषाशैलीने सुंदर रूप दिले आहे.**

बहिणाबाईंची कविता दैनंदिन जगण्याशी निगडीत आहे. श्रम, कष्ट, संसारतप आणि कष्टाच्या घामातून मिळणारे घवघवीत फळ यातून आयुष्याचा अर्थ शोधणारी आहे.बहिणाबाईची ओवी मोकळया सुराची आणि चिरेबंदी थाटाची आहे.त्यांची गाणी म्हणजे मराठी कवितेला देणगीच आहे.बहिणाबाईंची कविता ज्यावेळी रचली जात होती. ते १९व्या शतकातील अर्वाचिन युग होते. बहिणाबाईंची कविता वाचकांसमोर जेव्हा आली तेव्हा नवकाव्याच्या रूपाने दुसरे युगप्रवर्तन सुरू होते. त्यांचे नाते या दोन्ही युगाशी आहे असे म्हटले पाहिजे. बहिणाबाईंच्या अनुभव क्षेत्राला धरित्रीचा आधार आहे. आध्यात्मिकतेची जोड आहे. बहिणाबाई म्हणजे मातीचा हुंकार शोधणारी निसर्गकन्या आहे. त्यांच्या सर्व कविता वाचल्यानंतर माणसात व निसर्गात अधिक रमणारी ही कविता प्रतिमांची

मांडणी, यमक, अनुप्रास आणि साधेपणाचा अस्सल नमुना बहिणाबाईची कविता देते.त्यांच्या मनास जे जे भावले ते ते शब्दरूप झालेले आहे. ऐन तारूण्यात बहिणाबाईंना वैधव्याला सामोरे जावे लागले. त्यावेळी त्या म्हणतात-

**"लपे करमाची रेखा, माझ्या कुंकवाच्या खाली**
**पुसोनिया गेलं कुंकू, रेखा उघडी पडली."**
**शोकविव्हल बहिणा विचारते,**
**"सांग सांग धर्ती माता, अशी कशी जादू झाली**
**झाड गेलं निघीसनी, मांघे सावली उरली"**

येथे वसंत कानेटकरांच्या हिमालयाची सावली या नाटकाची आठवण येते.निसर्गाच्या कुशीत काम करीत असताना त्यांचं काव्यबीज अंकुरलं, फुललं धरतीच्या आकाशात त्या स्वर्ग पाहायच्या. पांडुरंगाचं गीता-भागवत त्या कुठे पाहत होत्या ते पाहा-

**"माझ्यासाठी पांडुरंगा, तुझं गीता-भागवत**
**पावसात सामावतं, माटीमंधी उगवतं"**

निसर्गाशी एकरूपता आणि कल्पनेची भरारी यातून त्यांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या कविता जाणवतात. देव अजब गारोडी असेही त्या म्हणतात.बहिणाबाई माहेरचं आणि सासरचं वर्णन, कोडकौतुक तितक्याच ताकदीनं करतात.

**"माहेरून दे निरोप**
**कानामंधी सांगे वारा**
**माझ्या माहेराच्या खेपा**
**लौकी नदीले इचारा"**
**तसेच**
**"हिच्या अंगामंधी दोन, सभावानं देवगाय**
**माले सासरी मियाली, जशी जन्मदाती माय"**

परमेश्वर हा सर्वत्र एकच आहे. बालाजी आणि इठोबा दोन्ही एकच देव आहेत. तसेच देव कुठे? हया कवितेतून त्या काय म्हणतात पाहा.

**"सदा जगाच्या कारनी, चंदनापरी घासला**
**अरे सोतामधी त्याले, देव दिसला दिसला"**
**'ज्याच्या हाताले घट्टे, त्याले देव भेटे'**

श्रमाचा महिमा अखिल मानव जातीला शिकविणारं हे त्यांचं अमर काव्य ! आजच्या विज्ञान आणि संगणक युगात वावरणाऱ्या मानवाला मनाचा शोध मात्र घेता येत नाही; परंतु या मानवी मनाचं अत्यंत यथार्थ आणि समर्पक असं चित्र बहिणाबाई त्यांच्या 'मन' या कवितेत उभं करतात.

**"मन एवढं एवढं, जसा खाकसाचा दाना**
**मन केवढं केवढं, आभायातबी मायेना"**

जीवनाचं सत्य आणि मौलिक शिक्षण देणारंही काव्य त्या लिहितात.

**"बिना कपाशीनं उले, त्याले बोंड म्हणू नहीं.**
**हरि नामाईना बोले, त्याले तोंड म्हणू नही.**

खानदेशातील सण - उत्सव याचं वर्णन त्या 'गुढी उभारुनी' आखाजी, पोया अशा कवितात करतात. त्या म्हणतात

**"आज पुंजा रे बैलाले, फेडी उपकाराचं देनं'**
**बैला खरा तुझा मान, शेतकऱ्या तुझं रीनं"**

बहिणाबाईंनी स्फूट ओव्याही रचल्या, त्यातून त्या असोद्याचा शेतकरी त्याच्या कष्टाचं, माहेरचं , शाळेचं, मानवी स्वभाव वैशिष्यांचं, निसर्गाचं वर्णन करतात. शेतकऱ्याविषयी त्या लिहितात.

**"जसा बोल्याले कर्रय, तसा कामाले करारी**
**स्वभावानं मन मोका, असोद्याचा शेतकरी" पुढे पाहा**
**कडूनिंबाच्या निंबोळी विषयीचे सूक्ष्म निरीक्षण -**
**"कडू बोलता बोलता, पुढे कशी नरमली**
**कडू निंबाची निंबोयी, शेवटी पिकीसनी गोड झाली.**

जळगावचा मेहरुण तलाव कशी तहान भागवितो आणि नाते संबंधांचे रेशमी पदरही त्या काव्यातून उलगडतात. सासू भिवराई, जाऊ, नणंद, गावातली वेडी, दारोदार फिरणारा भिकारी, अशा अनेक व्यक्तींच्या स्वभाव वर्णनांचे दर्शनही यात होते. शिवाय त्यांनी काही म्हणीही रचल्या आहेत.'हातात घडाय अन् फुकट गेला याय', रस्त्यात पडला सोन्याचा वाया, तिकडून आला भगा अभाया. बहिणाबाई माणसाला स्वत:ला सुधारवण्याचा जणू मार्गच दाखवितात. आजुबाजूला पाहा कुणाकडून कोणता गुण घ्यावा. याचे मार्गदर्शन त्या करतात. बोरा-बाभळींना काटे का आले असावे ? हे आपणास पडलेले कोडेही त्या उकलतात. त्यांची कविता थेट आतपर्यंत घुसते. 'जग हे मिथ्या आहे आणि संसार म्हणजे माया' या अडाणी शेतकरी कवयित्रीने जणू या लोकांना संसार कवितेतून संसाराचे मर्म व वर्म सांगितले. त्याला जगाच्या कोणत्याही भाषेतील सारस्वतात तोड नसेल ! या आमच्या प्रतिभासंपन्न कवयित्रीच्या काव्याची भरारी पाहाण्यासारखी आहे.

बहिणाबाईंच्या कवितेत काय नाही ! संसाराचं तत्त्वज्ञान आहे. विविध वस्तूंच्या समर्पक व्याख्या आहेत. सुंदर पण वास्तवपूर्ण व्यक्तिचित्रे आहेत. माणसाच्या 'मी' पणावर प्रहार आहे. सण, सांस्कृतिक संचित, सामाजिक नितीबोध सारे काही आहे. या साऱ्यांचा वेध घेणे शक्यच नाही. काव्याचा हा अथांग सागर आहे. त्यात बुडी मारुन जसजसे आपण खोल जाऊ तसतसे मौल्यवान माणिक मोती आपल्या हाती लागतील. या सागराचा तळ शोधणे अशक्य आहे पण या काव्यसागरातील काही बिंदू घेतले तरी जीवन सुकर होईल. त्यांच्या काव्यात अनेक काव्य गुण आहेत. पण महत्त्वाचे म्हणजे ते अस्सल खानदेशी लेवा पाटीदारांच्या बोलीत आहे. ही बोली त्यांच्या काव्यात संत तुकारामाप्रमाणे सहज सुंदरता आहे. मुळचाच खरा असलेला हा झरा आहे. ज्ञानेश्वरांच्या ग्रंथात जसे प्रत्येकाला आवडणारे काही तरी मिळतेच तसेच बहिणाबाईंच्या काव्यातही प्रत्येकाला आवडणारे, मनाला मोहविणारे काहीतरी मिळतेच त्यांच्या कविता म्हणजे जीवंत रसरशीत प्रतिभेचा मनोहारी अविष्कार आहे.याच कारणांमुळे बहिणाबाईंचे काव्य हदयस्पर्शी आहे. जीवनावरील भाष्य आहे. जीवनाचा मार्ग दाखविणारे आहे. तसेच काव्यदृष्ट्या अनेक गुणांनी नटलेले आहे. आहे का कोणत्या कवीच्या काव्यात एकाचवेळी एवढे गुण ! तिने भल्या भल्या बुध्दीवंतांनाही विचारप्रवण केले आहे. जर बहिणाबाई प्रकाशात आल्याच नसत्या तर त्यांनी सांगितलेल्या सोप्या भाषेतील जीवनाच्या तत्त्वज्ञानाला मराठी रसिक कदाचित मुकले असते. असे वाटते. सर्वगुणसंपन्न काव्य लेखन करणारी ही बहिणाबाई मराठी काव्यसृष्टीतील चमत्कार नाही तर काय !